मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 4 सप्टेंबर 2024 | पान- 1

# चिंचवड विधानसभेचे मैदान मोठया मताधिक्याने जिंकू : पंकजा मुंडे

## चिंचवडच्या विकासाचा प्रवाह कायम ठेवण्यासाठी सर्वांनी कामाला लागण्याचे आवाहन : पंकजा मुंडे यांच्याकडे पुण्यातील विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी सोपवली आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी गेल्या २० वर्षांत शहरात विकासाचा पाया रचल्याने चिंचवड मतदारसंघात पुन्हा पक्षाचाच आमदार होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता लक्ष्मणभाऊंचा विकासाचा वारसा पुढे नेण्यासाठी ही निवडणूक ताकदीने लढणार आहे, त्यासाठी चिंचवडच्या मैदानावर उतरून प्रत्येकाने आजच आपली जबाबदारी सांभाळा, मैदान आपणच जिंकू, अशा शब्दात आमदार पंकजा मुंडे यांनी सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांना कामाला लागण्याच्या सूचना केल्या.



भाजपाच्या राष्ट्रीय सचिव तथा आमदार पंकजा मुंडे यांच्याकडे आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्या अनुषंगाने आमदार मुंडे या मंगळवारी चिंचवड विधानसभा प्रवासावर होत्या. यावेळी भाजपा पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच माजी नगरसेवक - नगरसेविका, मोर्चा प्रमुख यांच्यासोबत आयोजित बैठकीत त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच, आगामी विधानसभा निवडणुकीत चिंचवड विधानसभा मतदार संघात एक लाखांहून अधिक मताधिक्यांनी आपला उमेदवार निवडून आणण्याचा निर्धार करण्यात आला. ही निवडणूक मोठ्या मताधिक्याने जिंकण्यासाठी सर्वांनी आजपासूनच कामाला सुरूवात करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार अमर साबळे, भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप, आमदार आश्विनी जगताप, प्रदेश सदस्य महेश कुलकर्णी, संतोष कलाटे, मोरेश्वर शेडगे, भारतीताई विनोदे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी महापौर उषा ढोरे, सरचिटणीस नामदेव ढाके यांच्यासह माजी नगरसेवक - माजी नगरसेविका, पदाधिकारी - कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, गेल्या वर्षभरात संघटनात्मक कार्यातून केंद्र व राज्य शासनाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम सूरू आहे. विश्वकर्मा योजना, लाडकी बहिण योजना, युवा प्रशिक्षण योजनांमधून नागरिकांचा भाजपा वरील विश्वास वाढला आहे. प्रत्येक कार्यकर्त्याला न्याय देण्याचे काम सूरू आहे. जनतेच्या या विश्वासावर चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक आणि नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत विजय पटकावला असून, आगामी विधानसभा निवडणूकीत भाजपाचा झेंडा मोठया मताधिक्याने फडकाविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

---

# पीसीएमसी स्मार्ट सारथी प्रकल्पाचा राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान

## मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आयुक्त शेखर सिंह यांनी स्वीकारला पुरस्कार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व स्मार्ट सिटीच्या "पीसीएमसी स्मार्ट सारथी" या प्रकल्पाला केंद्र शासनाचा 'ई-गव्हर्नन्स स्कीम २०२३-२४' अंतर्गत डिस्ट्रीक्ट लेव्हल इनिशिएटीव्ह्ज इन ई-गव्हर्नन्स'(ई-प्रशासनामध्ये जिल्हास्तरीय उपक्रम) या श्रेणीमध्ये सिल्व्हर पुरस्काराने मुंबई येथे सन्मानित करण्यात आले. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी नीलकंठ पोमण, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, अंकित भार्गव उपस्थित होते.



केंद्र शासनाच्या कार्मिक, सार्वजनिक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालयाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला. प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख पाच लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार निवारण विभाग (डीएआरपीजी), इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय (एमईआयटीवाय) आणि महाराष्ट्र राज्य सरकारच्या सहकार्याने दि. ३ व ४ सप्टेंबर, २०२४ रोजी मुंबई येथे २७ वी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. या दोन दिवसीय परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाले. सदर पुरस्कार सोहळ्यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसह संपूर्ण देशभरातून पाचशेपेक्षा जास्त संस्थांनी सहभाग नोंदविला. प्रशासनामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर केल्यामुळे महापालिकेला राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करण्यात आले आहे.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पीसीएमसी स्मार्ट सारथीच्या माध्यमातून नागरिकांना अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. महापालिकेच्या वतीने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून अनेक लोकोपयोगी प्रकल्प राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये नागरिकांना ऑनलाईन सेवा सुविधा उपलब्ध करून देणारे पीसीएमसी स्मार्ट सारथी मोबाईल ॲप्लिकेशन, दोन वर्षांमध्ये मिळकत कर संकलनामध्ये ५९% वाढ करणारा प्रॉपर्टी टॅक्स इम्प्रूव्हमेंट प्रोग्राम आणि आकडेवारीवर आधारित निर्णय घेण्यासाठी राबविण्यात येणारा सिटीझन हब फॉर डेटा अँड कम्युनिकेशन (सीएचडीसी) या प्रकल्पांचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे नागरिकांना सेवासुविधा उपलब्ध करून देण्याची कार्यक्षमता वाढली आहे. तसेच, कर संकलनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. सदर पुरस्कार मिळाल्यामुळे पिंपरी चिंचवडच्या नावलौकिकामध्ये भर पडली असून शहराचे नाव राष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाले आहे.

### महापालिकेचा प्रकल्प ठरतोय देशासाठी रोल मॉडेल

» पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना वेळेत व सातत्यपूर्ण माहिती मिळण्यासाठी महापालिकेच्या वतीने पीसीएमसी स्मार्ट सारथी ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे. या माध्यमातून, युटिलिटी अपडेट्स, ऑनलाइन कर भरणे, ऑनलाइन प्रमाणपत्रे तसेच ऑनलाईन तक्रार निवारण सेवा देण्यात येते. नागरिक पीसीएमसी कार्यालयात न जाता तक्रारीची स्थिती जाणून घेऊ शकतात.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत पदवीप्रदान समारंभ संपन्न

## दुर्लक्षित घटकाच्या विकासाला सहाय्यकारी होऊ शकतील अशी सॉफ्टवेअर, आरोग्यसेवा उत्पादने आणि बाजारपेठीय धोरणे बनवावीत, असा संदेश दिला.

**पुणे | प्रतिनिधी**

देशातील विविध समुदाय, प्रदेशांची संस्कृती आणि त्यांच्या आजच्या गरजा समजून घेत देशातील प्रत्येकाच्या विशेषतः दुर्लक्षित घटकाच्या विकासाला सहाय्यकारी होऊ शकतील अशी सॉफ्टवेअर, आरोग्यसेवा उत्पादने आणि बाजारपेठीय धोरणे बनवावीत, असा संदेश राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विद्यार्थ्यांना दिला.

सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठ लवळे येथे आयोजित २१ व्या पदवीप्रदान समारंभात राष्ट्रपती बोलत होत्या. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, विद्यापीठाचे कुलपती डॉ. शां. ब. मुजूमदार, कुलगुरु डॉ. रामकृष्णन रमण, प्र. कुलगुरु विद्या येरवडेकर आदी उपस्थित होते.

पदवीप्रदान सोहळ्यात पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन राष्ट्रपती श्रीमती मुर्मू म्हणाल्या, आज मुले आणि मुली प्रत्येक क्षेत्रात प्रगती करत आहेत. नारी शक्तीचा विकास हा देशवासियांसाठी अभिमानाचा विषय आहे, शिवाय देशाच्या विकासाचाही तो एक महत्त्वाचा मापदंड आहे. सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठात लिंग समानतेला प्राधान्य दिले जाते ही बाब प्रशंसनीय आहे. पदवीप्रदान सोहळ्यात सुवर्णपदक प्राप्त ११ विद्यार्थ्यांपैकी ८ मुली असल्यावरून मुलींच्या शिक्षणासाठीही येथे योग्य वातावरण आणि सुविधा दिल्या जातात, असे दिसून येते. मुलींना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासह त्यांच्यासाठी सुरक्षित आणि आश्वासक वातावरण निर्माण करण्यासाठी कार्यक्रम राबवण्याचे आवाहन राष्ट्रपतींनी शैक्षणिक संस्थांना केले.

जगातील अनेक भागातून या संस्थेत उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी येतात. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार होण्यासह देश-विदेशात आणि विविध क्षेत्रात प्रभावी योगदान देण्यासाठी एक मजबूत संपर्क जाळे (नेटवर्क) देखील बनवतात. भविष्यात विदेशातील विद्यार्थी आपल्या देशात गेल्यावरही या संस्थेशी नाते कायम ठेवतील तसेच आपल्या आधुनिक ज्ञान आणि कौशल्यांचा उपयोग मानवतेच्या कल्याणासाठी करतील, असा विश्वासही राष्ट्रपतींनी व्यक्त केला.

राष्ट्रपती पुढे म्हणाल्या, शिक्षण व्यवस्थेत संशोधनाला चालना देण्याची आवश्यकता आहे. अनेक वर्षांच्या संशोधनामुळे नवीन शोध, आणि आव्हानांना तोंड देण्यासाठी नवीन उपाय शोधले जातात. भारतातील संशोधक विद्यार्थी केवळ देशाच्याच नव्हे तर जगाच्या समस्यांवर उपाय शोधू शकतात. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही संशोधनावर भर देण्यात आला असून बहु- शाखीय अभ्यासक्रम आणि समग्र शिक्षणालाही चालना दिली जात आहे, असेही त्या म्हणाल्या.




### विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग रोजगारनिर्मितीसाठी करावा : राज्यपाल

**» देश विदेशातील विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग रोजगार निर्मितीसाठी करावा; गरिबी, वंचितता, युद्ध, अस्थिरता आणि अन्य कारणांमुळे समाजाच्या परिघाबाहेर जगणाऱ्या लोकांचाही विचार करावा, असे आवाहन श्री. राधाकृष्णन यांनी यावेळी केले.बदलत्या काळानुसार कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग सारखे क्षेत्र उदयास येत असून यामुळे अनेक नोकऱ्या कालबाह्य ठरतील. तथापि, त्यामुळे अनेक नवीन रोजगारही निर्माण होणार असून या क्षेत्राचे ज्ञान घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निश्चितच नवीन संधींचा लाभ होणार आहे, असेही राज्यपाल म्हणाले. सिम्बायोसिस जगभरातील विद्यार्थ्यांना आणि विशेषतः अफगाणिस्तानसह अन्य देशांतील मुलींसाठी ऑनलाइन पदवी अभ्यासक्रम राबविते, हे अत्यंत कौतुकास्पद आहे. सिम्बायोसिसने जगातील विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट शैक्षणिक वर्ग चालवावेत असे सांगून ज्ञानाचा प्रकाश जगाच्या कानाकोपऱ्यात पसरवला पाहिजे, असेही ते म्हणाले**

### संशोधनाला चालना देण्याची आवश्यकता

**» शिक्षण व्यवस्थेत संशोधनाला चालना देण्याची आवश्यकता आहे. अनेक वर्षांच्या संशोधनामुळे नवीन शोध, आणि आव्हानांना तोंड देण्यासाठी नवीन उपाय शोधले जातात. भारतातील संशोधक विद्यार्थी केवळ देशाच्याच नव्हे तर जगाच्या समस्यांवर उपाय शोधू शकतात. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातही संशोधनावर भर देण्यात आला असून बहु- शाखीय अभ्यासक्रम आणि समग्र शिक्षणालाही चालना दिली जात आहे, असेही त्या म्हणाल्या.**

# सार्वजनिक गणेश मंडळांनी अधिकृत वीजजोडणी घ्यावी, महावितरणचे आवाहन

## यंदाच्या गणेशोत्सवात सार्वजनिक मंडळांना महावितरणकडून विनाविलंब तात्पुरत्या नवीन वीजजोडण्या देण्यात येत आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

यंदाच्या गणेशोत्सवात सार्वजनिक मंडळांना महावितरणकडून विनाविलंब तात्पुरत्या नवीन वीजजोडण्या देण्यात येत आहेत. सर्वधर्मीयांच्या उत्सवासाठी घरगुती दराने वीजदर आकारण्यात येत आहे. त्यामुळे सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांनी अधिकृतपणे तात्पुरती वीजजोडणी घ्यावी असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

गणेशोत्सवाच्या काळात मंडपात शॉर्टसर्किट होणे, विद्युत वायरिंगमध्ये बिघाड होणे आदी कारणांमुळे संभाव्य धोके टाळण्यासाठी सर्व गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित क्षेत्रातील महावितरणचे अभियंता व कर्मचारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवून ठेवावेत. तसेच तातडीच्या मदतीची गरज भासल्यास पुणे व पिंपरी चिंचवड शहर, आंबेगाव, जुन्नर, मावळ,खेड, मुळशी, वेल्हे, हवेली तालुक्यांसाठी पुणे परिमंडलाने उत्सवातील दहा दिवसांसाठी ७८७५७६७१२३ हा विशेष संपर्क क्रमांक उपलब्ध करून दिला आहे. यासोबतच नेहमीच्या १९१२ किंवा १८००२१२३४३५ किंवा १८००२३३३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधता येईल.

गणेशोत्सवाच्या कालावधीत पावसाची शक्यता असल्याने गणेश मंडळांनी संभाव्य धोके टाळण्यासाठी वीज यंत्रणेची योग्य काळजी घ्यावी. मंडपाची व रोषणाईसाठी विद्युत व्यवस्था व संच मांडणी ही अधिकृत विद्युत कंत्राटदारांकडूनच करून घेणे आवश्यक आहे. गणेश उत्सव मंडपातील वीजयंत्रणेचे अर्थिंग सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी. मंडळाच्या अंतर्गत वायरचे इन्सूलेशन खराब झाल्यास अशा वायर्समधून मंडपाच्या लोखंडी पत्र्यांमध्ये किंवा ओल्या वस्तुंमध्ये विद्युत प्रवाह येऊ शकतो. हा प्रकार टाळण्यासाठी वायर्सचे जोड काढून टाकावेत किंवा जोड द्यायचा असल्यास योग्य क्षमतेच्या इन्सूलेशन टेपने जोड देण्यात यावा. स्वीचबोर्डच्या मागे प्लायवूड किंवा लाकडी फळी लावल्याची खात्री करून घ्यावी. विजेच्या लघुदाब व उच्चदाब वाहिन्या, रोहीत्र तसेच फिडर पिलर व इतर यंत्रणेला गणेशोत्सवातील आणि मिरवणुकातील देखाव्यांचा स्पर्श होणार नाही याची दक्षता घ्यावी.



### अनधिकृत विजेचा वापर केल्यास कारवाई

**» गणेश मंडळांनी अनधिकृत विजेचा वापर केल्यास भारतीय विद्युत कायदा २००३ नुसार कारवाई करण्यात येणार आहे. गणेशोत्सवात वीजपुरवठा आणि जनरेटरसाठी स्वतंत्र न्यूट्रल घेणे अत्यावश्यक आहे. काही कारणास्तव वीजपुरवठा बंद असताना जनरेटर सुरु केल्यास एकाच न्यूट्रलमुळे जनरेटरमधील वीजप्रवाह लघुदाब वीजवाहिनीमध्ये प्रवाहित होतो व त्यातून जीवघेण्या अपघाताची शक्यता निर्माण होते.**

# पोलीस भरतीनंतर सिंथेटिक ट्रॅक उखडला

## वारंवार नादुरुस्त होणाऱ्या धावमार्गामुळे प्रशिक्षक, खेळाडूंचा संताप : चार कोटींचा खर्च पाण्यात

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी, इंद्रायणीनगर येथील संत ज्ञानेश्वर महाराज क्रीडा संकुलात चार कोटी रुपये खर्च करून नव्याने तयार केलेला कृत्रिम धावमार्ग (सिंथेटिक ट्रॅक) पुन्हा उखडला आहे. पोलीस भरती प्रक्रियेसाठीची शारीरिक चाचणी झाल्यानंतर धावमार्गाची दुरवस्था झाली आहे. वारंवार नादुरुस्त होणाऱ्या धावमार्गामुळे खेळाडूंना अडचणींचा सामना करावा लागत आहे. सरावाअभावी खेळाडूंच्या कामागिरीवरही परिणाम झाला आहे. धावमार्गाच्या कामाच्या दर्जाबाबत प्रश्न निर्माण झाला असून चार कोटींचा खर्च पाण्यात जाण्याची शक्यता आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील ॲथलेटिक्सचा सराव करणाऱ्या खेळाडूंना सरावासाठी इंद्रायणीनगरमधील एकमेव मैदान आहे. या ठिकाणी चारशे मीटरचा आठ लेनचा कृत्रिम धावमार्ग आहे. अनेक वर्षांपासून धावमार्गावर खेळाडूंचा नियमित सराव आणि विविध स्पर्धांमुळे, तसेच बाहेरील वातावरणामुळे जुना धावमार्ग खराब झाला होता. वर्षभरापूर्वी जुना धावमार्ग बदलण्याचे काम हाती घेण्यात आले होते. महापालिकेने चार कोटी रुपये खर्च करून हा नवीन धावमार्ग उभारला. १५ मार्च २०२४ रोजी एक वर्षानंतर खेळांडूंसाठी हा धावमार्ग खुला करण्यात आला. धावमार्गावर ॲथलेटिक्स खेळाडू सराव करत असताना अवघ्या पाचच दिवसांत हा मार्ग उखडला होता. त्यामुळे दुरुस्तीसाठी हा धावमार्ग बंद करण्याची नामुष्की महापालिकेवर आली होती. जून महिन्यात या मैदानावर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या शिपाई पदाच्या पोलीस भरतीसाठी उमेदवारांची निवड क्षमता चाचणी घेण्यात आली. त्यानंतर हा धावमार्ग पूर्णपणे उखडला असून जागोजोगी खड्डे पडले आहेत. त्यामुळे या धावमार्गावर सराव करताना ॲथलेटिक्स खेळाडूंना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

ॲथलेटिक्स खेळाची माहिती नसलेले लोक धावमार्गाबाबत निर्णय घेत आहेत. दोन वर्षांपासून सरावात सातत्याने अडथळे येत आहेत. त्यामुळे खेळाडूंचे नुकसान झाले आहे. सराव पूर्ण न झाल्याने काही खेळाडूंचे राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्याचे स्वप्न पूर्ण झाले नाही. खेळाडूंच्या भवितव्यासाठी धावमार्ग तातडीने दुरुस्त करावा अशी मागणी ॲथलेटिक्स क्रीडा प्रशिक्षक दिनेश देवकाते यांनी केली.

### धावमार्ग पुन्हा बंद?

**» बालेवाडी मैदानात २१ आणि २२ सप्टेंबरला राज्यस्तरीय ॲथलेटिक्स खेळाडू निवड स्पर्धा होणार आहे. आता दुरुस्तीच्या नावावर पुन्हा धावमार्ग बंद केल्यास सरावाअभावी राज्यस्तरीय निवड चाचणीत मागे पडण्याची भीती काही खेळाडू आणि ॲथलेटिक्स प्रशिक्षकांनी बोलून दाखविली. त्यामुळे हा धावमार्ग सरावासाठी खुलाच ठेवण्याची मागणी खेळाडूंमधून होत आहे.**

> “ पोलीस भरतीसाठी मोठ्या संख्येने परीक्षार्थी मैदानावर आले होते. शहरासाठी भरतीही आवश्यक होती. धावमार्गावर विशिष्ट बूट घालून गेले पाहिजे. ठेकेदाराला पाठिशी घातले जाणार नाही. त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी केली जाईल. तपासणीत त्रुटी, कामाचा निकृष्ट दर्जा आढळल्यास ठेकेदाराकडून पैसे वसूल केले जातील. ठेकेदाराची अनामत रक्कम महापालिकेकडे आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

---

# उद्योगनगरीत ढोल-ताशांचा तालमय निनाद टिपेला

## नदीचे घाट, मोकळी मैदाने, शाळांची मैदाने या ठिकाणी ढोल ताशा पथकांचा सराव सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

एरव्ही यंत्र-सामग्रींच्या आवाजाला सरावलेल्या उद्योगनगरीत आता ढोल-ताशांचा तालमय निनाद घुमू लागला असून त्यांच्या आवाजाने मैदाने दुमदुमत आहेत. ढोल-ताशा पथकांच्या सरावाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून यंदा काय वेगळी वेशभूषा करायची ? कशा प्रकारे सादरीकरण करायचे, याची चर्चा पथकांमध्ये रंगत आहे.



गणेशोत्सव मग तो घरगुती असो वा सार्वजनिक. लाडक्या गणरायाचे स्वागत वाजत-गाजत केले जाते. सार्वजनिक गणेश मंडळांच्या बाप्पाचे आगमन हे ढोल-ताशांच्या गजरात करण्याचा पायंडा पडला आहे.

त्यामुळे, गणेशोत्सव व ढोल-ताशा हे एक समीकरणच झाले आहे. सध्या शहरातील गणेशोत्सवाच्या लगबगीत उद्योगनगरीत ढोल-ताशा वादनाच्या आवाजाने मैदाने दुमदुमत आहेत. नदीचे घाट, मोकळी मैदाने, शाळांची मैदाने या ठिकाणी ही ढोल ताशा पथके सराव करत आहेत. ढोल व ताशा वादनामध्ये तालाला महत्त्व असते. त्यामुळे, सध्या पथकांमध्ये त्यावर अधिक भर दिला जात आहे.

### हटके वेशभूषांवर चर्चा

बहुतांश ढोल-ताशा पथकांचा गणवेश (ड्रेसकोड) हा ठरलेला असतो. गेल्यावर्षी उज्जैनच्या महाकाल आरतीचा ट्रेंड काही ढोल-ताशा पथकांमध्ये दिसून आला. त्यामुळे, यावर्षी काय वेगळी वेशभूषा करायची ? ही देखील चर्चा सध्या पथकांमध्ये रंगत आहे.

### सदस्यांच्या संख्येत वाढ

**» पिंपरी-चिंचवड शहरात एकूण ५६ ते ५७ पथके असून प्रत्येक ढोल-ताशा पथकांतील वादकांची संख्या ही शंभर ते दीडशेच्या पुढे आहे. ढोल-ताशा पथकांकडे युवा पिढी जास्त प्रमाणात आकर्षित होत आहे. सरावासाठी शेवटची तयारी सुरू असून तालीवर भर जास्त आहे. गेल्या तीन वर्षांपासून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या आगमन सोहळ्यात ढोल-ताशा वाजून त्याचे जल्लोषात स्वागत केले जात आहे, असे गंधाक्ष वाद्य पथक ट्रस्टचे देवेंद्र पुळेकर यांनी सांगितले.**

> “ गणेशाच्या आगमनाच्या तयारीत भरपूर प्रमाणात वेग आला असून तालांवर भर देऊन सराव सुरू आहे. या पथकात एकूण दोनशे वादक असून दरवर्षी पथकाद्वारे वेगवेगळ्या तालांवर भर दिला जातो. दहीहंडीच्या दिवशी महिला ढोल वाजू शकते; तर नराधमाला देखील ठोकू शकते, अशा संदेश देणाऱ्या तालरचना तयार करण्यात आल्या आहेत.
>
> **- लोकेश पाटील, गणनाद वाद्य पथक**

> “ आमचा अंतिम टप्प्यातील सराव हा वेगवेगळ्या ताल आणि सूरांवर देण्यात येत आहे. दीड महिन्यापूर्वी सराव करण्यास सुरूवात करण्यात आली. यावर्षी गणेश आगमनाच्या दिवशी पुण्यातील नातूबाग गणपती, थेरगावातील दत्ता प्रतिष्ठान थेरगाव, वाकडच्या सुदर्शन तालीम येथे वादन करण्यात येणार आहे.
>
> **- विशाल मानकर, शिवाज्ञा ढोल ताशा पथक**

# लाभार्थ्यांनी घेतला तांदूळ बंदचा धसका

## स्वस्त धान्य दुकानचालक आणि कार्यालयात होतेय विचारपूस : 1300 मे. टन तांदूळ होणार कमी, लाभार्थ्यांना फटका

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या धोरणानुसार राज्यात वाटप करण्यात येणाऱ्या मोफत तांदूळ बंद करण्याबाबत विचार सुरू आहे. दरम्यान, यानंतर लाभार्थ्यांनी त्याचा धसका घेतला असून, शहरातील स्वस्त धान्य दुकानदार आणि शिधापत्रिका कार्यालयातही विचारपूस सुरू करण्यात आली आहे. एकीकडे सणासुदीच्या दिवशी वाटप करण्यात येणाऱ्या आनंदाचा शिधा देण्याच्या हालचाली सुरू असताना दुसरीकडे हा मोठा फटका लाभार्थ्यांना बसणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून मिळणारा हक्काचा तांदूळ बंद होणार का, असा प्रश्न लाभार्थी विचारत आहेत. केवळ पिंपरी-चिंचवडचा विचार केला असता, या परिसरात जवळपास १३०० मेट्रिक टन तांदळाचे वाटप केले जाते.



पुण्यासह पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये शिधापत्रिकाधारक मोठ्या प्रमाणात आहेत. अन्नधान्य वितरण व पुरवठा कार्यालयाच्या वतीने धान्य दुकानदारांना दर महिन्याला धान्याचा कोटा निश्चित केला जातो. अन्नसुरक्षा आणि अंत्योदय योजनेच्या शिधापत्रिकाधारकांना गहू आणि तांदळाचे वाटप केले जाते. शासनाने 'एक देश एक कार्ड' या योजनेंतर्गत देशात कोठेही धान्य घेण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. पिंपरी-चिंचवड शहरात रोजगारासाठी इतर जिल्ह्यातून देखील मोठ्या प्रमाणात नागरिक दाखल होत आहेत. शहरात साडे तीन लाख शिधापत्रिका कार्यरत आहेत. दरम्यान, नव्या धोरणानुसार आता बदल करण्यात येणार असून त्याचा फटका शहरातील तीन कार्यालयाअंतर्गत चालणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना बसणार आहे. त्याऐवजी इतर वस्तू देण्याच्या हालचाली सुरू आहेत.

दरम्यान, गौरी गणपतीच्या सणानिमित्त आनंदाचा शिधा वाटपाचे कामकाज सुरू होणार आहे. या आनंदाचा शिधामध्ये यंदा पोहे वगळण्यात आलेले आहेत. तसेच मैदाही देण्यात येणार नाही. तर उरलेल्या ४ वस्तू देण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्याचा विचार करता साडेतीन लाख किट वाटप करण्यात येणार आहेत. दरम्यान एकीकडे हे वाटप सुरू करत असताना, तांदूळ वगळण्याचा निर्णय घेण्याबाबत नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. त्यामुळे इतके दिवस रेशनच्या तांदळावरती आपली एक वेळची भूक भागवणाऱ्या अनेक लाभार्थ्यांना याचा मोठा फटका बसणार आहे. तूर्तास, असा कोणता आदेश अथवा निर्णय झाला नसल्याचे अधिकारी सांगत आहेत. मात्र, ते याबाबत ठोस बोलण्यास देखील तयार नाहीत.

### अधिकाऱ्यांमध्ये संभ्रम, लाभार्थ्यांमध्ये खळबळ

तांदूळ बंद होण्याच्या पार्श्वभूमीवर परिमंडळ अधिकाऱ्यांना याची नीटशी माहिती नसल्याचे समोर आले आहे. परिमंडळ कार्यालयात याबाबत विचारले असता, स्थानिक अधिकाऱ्यांनी असे कोणतेही पत्र अथवा आदेश आले नसल्याचे स्पष्ट केले. तसेच दैनंदिन आणि पुढील महिन्यात देखील तांदूळ येणार असल्याचे सांगितले. दुसरीकडे, आनंदाच्या शिधा वाटपाचे देखील कामकाज सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

### चालू महिन्यातील वाटप

» पिंपरी-चिंचवड शहर अंतर्गत अ, ज आणि फ अशी तीन कार्यालय मोडतात. ते अनुक्रमे पिंपरी, चिंचवड आणि भोसरी अशी आहेत. या तिन्ही कार्यालयांतर्गत जवळपास बाराशे टन तांदळाचे वाटप केले जाते. त्यामध्ये सर्वाधिक तांदूळ वाटप हे भोसरीमध्ये असून ते जवळपास ४९९ मे. टन एवढे आहे. त्या पाठोपाठ चिंचवड ४८२ मे. टन आणि त्यानंतर पिंपरीमध्ये ४१८ मे. टन तांदळाचे वाटप केले जाते. याचा जवळपास साडेतीन हजार लाभार्थी लाभ घेतात. दरम्यान या महिन्याचा म्हणजेच सप्टेंबरचा तांदूळ दाखल झाला आहे, तर पुढील महिन्यात दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तांदूळ येण्याची शक्यता दुकानदारांनी व्यक्त केली आहे.

### निकृष्ट तांदळाच्या तक्रारी

» शिधापत्रिकाधारकांना वाटप केलेला तांदूळ हा अत्यंत निकृष्ट दर्जाचा असल्याचे लाभार्थी सांगत आहेत. काही ठिकाणी तुकडा आणि काही ठिकाणी नुसत्या पावडरसारखा तांदूळ मिळत आहे. याबाबत पुणे, पिंपरी-चिंचवड शहरातील स्वस्त धान्य दुकानदारांनी संबंधित अधिकाऱ्यांनाही याची कल्पना दिली होती. मात्र, हा तांदूळ तसाच वापरा, यानंतरचा तांदूळ देऊ, असे मोघम उत्तर देण्यात आले. प्रत्यक्षात तांदळाची गुणवत्ता बिघडल्याने लाभार्थ्यांनी नाराजी व्यक्त केलेली आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडेही तक्रार करण्यात येणार आहे.

# वैद्यकीय महाविद्यालयांच्या नफेखोरीला चाप

## विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये उकळणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयांना आता मोठा चाप बसला

**पुणे | प्रतिनिधी**

वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशावेळी अनामत रक्कम (कॉशन मनी) म्हणून विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये उकळणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयांना आता मोठा चाप बसला आहे. शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) या महाविद्यालयांना ५० हजारांपेक्षा अधिक शुल्क आकारता येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. एफआरएने वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी अनामत रक्कम ठरविली असून, ती रक्कम शिक्षण संपल्यानंतरही ९० दिवसांमध्ये विद्यार्थ्यांना परत करणे अनिवार्य आहे.

यासंबंधीचे परिपत्रक “एफआरए’चे सदस्य सचिव एस. राममूर्ती यांनी प्रसिद्ध केले आहे. राज्यातील एमबीबीएस अभ्यासक्रमाचे काही महाविद्यालये ८ ते १० लाख रूपये शैक्षणिक शुल्कासोबतच अनामत रकमेसोबतच होस्टेल, ग्रंथालय, प्रयोगशाळा, मेस आदींसाठी एकूण पाच लाखांपेक्षा अधिक रक्कम आकारतात. ही सुरक्षा ठेव साधारण साडेचार वर्षांसाठी ठेवण्यात येते.



या रक्कमेवरील व्याजाची रक्कम महाविद्यालय प्रशासन आपल्याकडे ठेवत असून, त्याद्वारे नफा कमवत असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. मात्र, त्याचा उल्लेख कुठेही महाविद्यालय प्रशासनाकडून आपल्या जमा-खर्चाच्या यादीत नमूद करण्यात येत नाही. त्याचप्रमाणे ही रक्कमही महाविद्यालय विद्यार्थ्यांना लवकर परत करीत नाही. याबाबत तक्रारी आल्यानंतर “एफआरए’ने हा निर्णय घेतला आहे.

“एफआरए’ने एमबीबीएस, एमडी, एमएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस, बीएस्सी नर्सिंग अशा १६ वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी अनामत रक्कम किंवा इतर शुल्क म्हणून रक्कम ठरवून दिली आहे.

### अभ्यासक्रम – शुल्क

» एमबीबीएस, एमडी, एमएस, डीएम – ५०,०००
» बीडीएस (यूजी, पीजी) – ४०,०००
» बीएएमएस, बीएचएमएस (यूजी, पीजी) – २५,०००
» बीयूएमएस (यूजी, पीजी) – १०,०००
» बीपीटीएच, एमपीटीएच – २०,०००
» बीएस्सी, एमएस्सी नर्सिंग – १०,०००

या नियमाची अंमलबजावणी न करणाऱ्या कॉलेजांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा एफआरएने दिला आहे.

### नव्या नियमावलीतील ठळक मुद्दे

प्रवेशावेळी रक्कम भरण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ द्यावा

रक्कम भरण्याची जबरदस्ती करता येणार नाही.

ही रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवावी लागेल. व्याजाची रक्कम उत्पन्नाचे साधन म्हणून दर्शवावी लागणार.

याची सर्व माहिती “एफआरए’कडे द्यावी लागेल.

रकमेची माहिती बँक खाते तसेच अकाउंट बुकमध्ये दर्शवावी लागेल.